सकाळ पुणे, गुरुवार, १४ फेब्रुवारी २०१३

# केसांच्या समस्या व उपचार

केस गळणे किंवा टक्कल पडणे ही समस्या पुरुष, स्त्रिया किंवा लहान मुलांमध्येही जाणवते, याची कारणे अनुवंशिकता, काही औषधांचे दुष्परिणाम किंवा इतर काही आजारही असू शकतात.

टक्कल पडणे म्हणजे डोक्यावरील केस अति प्रमाणात कमी होणे, बरेच जण अशावेळी काही उपचार करण्याऐवजी हेअरस्टाईलमध्ये बदल करतात. काही जण टोपी किंवा रूमालाने लपविण्याचा प्रयत्न करतात, तर काहीजण काहीही न करता दुर्लक्ष करतात; पण असेही लोक आहेत की जे काही औषधोपचारांचा विचार करून योग्य वेळीच ईलाज करून घेतात.

कुठलेही उपचार घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेऊन तुमच्या केसगळतीचा प्रकार, त्याची कारणे हे योग्य प्रकारे समजून घेणे आवश्यक आहे.

**लक्षणे** - डोक्याचा वरील भाग माथ्यावरील केस जाणे हा प्रकार पुरुष व स्त्रिया दोन्हींमध्ये जाणवतो. पुरुषांमध्ये कपाळावरील केस मागे जायला लागतात व इंग्लिशमधील एम आकाराप्रमाणे केस विरळ होतात. स्त्रियांमध्ये सहसा केसरचना मागे जात नाही; पण भांगामधील केस पातळ दिसायला लागतात.

गोलाकार एकाच भागातील केस जाणे या प्रकारात एखाद्या इंचभर किंवा त्यापेक्षा जास्त केस गोलाकार पद्धतीत नाहीसे होतात, शक्यतो हा प्रकार डोक्यावरील केसांबाबतीत जाणवतो; पण कधी कधी भुवया व दाढीमधल्या केसांमधेही जाणवतो, काही वेळेस केस जाण्यापूर्वी खाज किंवा दाह जाणवतो.

**अचानक केस गळणे**- अति प्रमाणात शारीरिक किंवा मानसिक ताण झाल्यास हा प्रकार जाणवतो.

केस विंचरताना, धुतांना किंवा केसांमध्ये नुसता हात फिरवला तरी मूठभर केस हातात येतात. या प्रकारात एकाच भागावर टक्कल दिसून न येता डोक्यावरील केसांचा दाटपणा किंवा घनता कमी होते.

**डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा**- अचानक केस जाणे किंवा एकाच भागावरील केस जाणे, केस विंचरताना किंवा धुतांना इतर वेळेपेक्षा जास्त केस जाणे, अचानक केस गळणे हे काही आजाराचे लक्षणही असू शकते. त्यामुळे उपचारांची गरज भासते

केस गळती ही प्रत्येकामध्ये वेगवेगळ्या प्रकारे कमी-अधिक प्रमाणात जाणवते. काही जणांना अचानक तर काही जणांना हळू व कमी प्रमाणात केस गळणे जाणवते. केसांच्या नैसर्गिक चक्रात अनेक कारणांमुळे बिघाड निर्माण होतो व पेशंटची पूर्ण माहिती घेतल्यानंतर कारणेही लक्षात येतात.

बऱ्याच जणांमध्ये दिवसाला ५० ते १०० केस गळतात, कारण साधारण १००००० केसांमधून एवढे केस गळाले तरी केसांच्या दाटपणांत फारसा फरक जाणवत नाही; पण वयोमानाप्रमाणे केसांच्या मूळ व परिणामी केसही पातळ व्हायला लागतात व अगदी ५० केस गळाले तरी काही दिवसांनी केसांचा दाटपणा कमी जाणवतो.

**कारणे** : अनुवंशिकता एखाद्याच्या कुटुंबात किंवा जवळील नातेवाईकांमध्ये केस गळणे किंवा टक्कल पडले असेल तर इतरांमध्येही टक्कल पडणे जाणवू शकते व टक्कल पडण्याचे वय व प्रमाण हे अनुवंशिकतेवर अवलंबून असते.

**केमिकल्सचा वापर**- चुकीचे सौंदर्य प्रसाधने व त्यांचा अति प्रमाणात वापर, केसांचे कलर केस सरळ करणारी उत्पादने व उपचार यांमुळे केस कमकुवत होतात, तसेच वेगवेगळ्या केस रचना केल्याने केस अति ओढले गेल्यामुळे केस पातळ होतात.

चाई पडणे शरीरातील रोग प्रतिकार शक्ती बिघाड होऊन केसांच्या मुळांवर त्यांचा हल्ला झाल्यास सपाट व गोल आकारात केस जातात.

डोक्यावरील त्वचेचा संसर्ग काही संसर्गजन्य आजार केस व केसांची त्वचेवर हल्ला करतात व त्यामुळे त्या भागावरील केस जातात; पण हे आजार पूर्ण बरे झाल्यानंतर केस परत येतात, पण काही त्वचेच्या आजारांमध्ये त्वचेवर व्रण किंवा चट्टा पडतो अशा वेळी केस परत येणे कठीण असते. त्यामुळे अशा प्रकारच्या आजाराकडे दुर्लक्ष करू नये, कारण वेळीच इलाज केल्यास त्याचा विस्तार थांबविता येतो व उरलेले केस चांगले राहू शकतात.

होमिओपॅथिक उपचार पद्धतीत कुठल्याही दुष्परिणामाशिवाय वजन कमी होणे, त्वचेचे आजार, स्त्रियांचे आजार किंवा इतर जुनाट व्याधींवर उपचार होतात व आजार समूळ नष्ट होण्यास मदत होते

**डॉ. ज्योती चव्हाण/**
**डॉ. अभिजीत चव्हाण**
बालाजी क्लिनिक
(टँक रोड, मेंटल कॉर्नर, विश्रांतवाडी)

# केसांचे विकार व त्यावरील उपचार

आजकाल केस गळणे, केस अकाली पांढरे होणे, तसेच केसांमध्ये कोंडा होणे या समस्या सर्व वयोगटांत जाणवतात. त्याकरिता बाह्य उपचारांबरोबरच पोटातून होमिओपॅथिक औषधे घेतल्याने निश्चित फायदा होतो.

शरीरात आवश्यक पोषणमूल्यांचा अभाव, चिंता, मानसिक अस्वस्थता, केमिकल्सचा अतिप्रमाणात वापर, कोंडा व अनुवांशिक टक्कल पडणे यांसारखी बरीच कारणे केस गळण्यास कारणीभूत ठरतात. तसेच स्त्रियांमध्ये वरील कारणांव्यतिरिक्त मासिक पाळीमध्ये अनियमितता, थायरॉईडचा त्रास व ॲनिमिया इ. कारणे प्रामुख्याने आढळतात. पेशंटची पूर्ण माहिती घेताना असे लक्षात येते की, एका पेशंटमध्ये केस गळण्याची कारणे ही वर नमूद केल्याप्रमाणे एकापेक्षा अनेकही असू शकतात व त्या कारणांचा पूर्णपणे विचार करून उपचार करणे फायदेशीर ठरते. स्त्रियांमध्ये व पुरुषांमध्ये केस गळण्याचे विविध प्रकार आढळतात. त्यात ठराविक भागांवर केस गळण्यास सुरुवात होते. उदा.- पुरुषांमध्ये कपाळाचा वरील भाग उघडा पडणे, माथ्यावरील केस कमी होणे, तसेच स्त्रियांमध्ये केसांचा भांग पातळ होणे व केसांचा पातळपणा वाढणे हे प्रकार आढळतात.

केस गळणे किंवा केस विरळ होणे हे एक लक्षण आहे. पण मूळ कारण म्हणजे केसांच्या नैसर्गिक चक्रात (Hair Cycle) बिघाड निर्माण होणे की, जे वर सांगितलेल्या कारणांमुळे होऊ शकते. केसांच्या नैसर्गिक चक्रात ॲनाजेन, कॅटाजेन व टिलोजेन हे तीन टप्पे असतात. जेव्हा हे नैसर्गिक चक्र सुरळीतपणे काम करत असते, त्यावेळी केस जरी थोड्याफार प्रमाणात गळत असले तरी त्यांची पुन्हा वाढही होते व केस विरळ होणे जाणवत नाही. पण याउलट केसांच्या नैसर्गिक चक्रात बिघाड निर्माण झाल्यास केस कमी-अधिक प्रमाणात गळल्यानंतर त्यांची योग्य त्या प्रमाणात वाढ होत नाही व हे सतत चालू राहिल्यास दिवसेंदिवस केसांचा विरळपणा व टक्कल वाढायला लागते.

काही पेशंटमध्ये शरीरातील रोगप्रतिकारक शक्तीत बिघाड निर्माण होतो व त्यामुळे शरीरातील चांगल्या प्रतीच्या पेशींवर हल्ला केला जातो व अशा पेशंटमध्ये ठराविक भागांवरील केस जाण्यास सुरुवात होते. त्यालाच चाई पडणे असेही म्हणतात. अशा पेशंटची पूर्ण माहिती घेतल्यास थायरॉईड, त्वचेचे किंवा इतर जुनाट आजारही सापडतात व त्यामुळे डोक्यावर, भुवयांमध्ये तसेच पुरुषांमध्ये दाढी व मिशीमध्ये चाई पडायला लागते. काही पेशंटमध्ये शरीरातील इतर भागांवरील केसही जायला लागतात (Alopecia totalis), तर काही जणांमध्ये संपूर्ण शरीरावरील केस निघून जातात (Alopecia universalis). अशा पेशंटला दीर्घ उपचारांची गरज असते.

कॉम्प्युटराईज्ड हेअर व स्काल्प चेकअपमुळे केसांचा पातळपणा, दोन केसांमधील अंतर, केसांचे मूळ, तसेच कोंड्याचा प्रकार व त्याचे प्रमाण यांचे सुक्ष्म निरीक्षण केले जाते व व्याधीचे निदान होण्यास मदत होते. होमिओपॅथिक औषधे घेतल्याने केसांचे नैसर्गिक चक्र सुधारण्यास मदत होते. त्याकरिता औषधांचे नियमित व सांगितलेल्या कालावधीपर्यंत सेवन करणे फायदेशीर ठरते. औषधांसोबत योग्य तो आहार घेतल्यास शरीरात पोषणमूल्यांची वाढ होते व केसांची योग्य ती काळजी घेतल्याने केस गळणे कमी होते. तसेच केसांची नवीन वाढ होण्यास मदत होते. तसेच कॉम्प्युटराईज्ड स्किन चेकअप केल्यानंतर होमिओपॅथिक उपचारांद्वारे त्वचेचे विकार, उदा.- पिंपल्स, सोरायसिस, इसब, पांढरे डाग यांसारख्या अनेक व्याधींवर समूळ उपचार केले जातात. तसेच आहाराचे योग्य पालन केल्यास रुग्णांना लवकर फायदा होतो. होमिओपॅथिक औषधांचा फायदा पेशंटला औषधे बंद केल्यानंतरही दीर्घकाळ जाणवतो. तसेच आजार समूळ नष्ट होण्यास मदत होते.

- डॉ. अभिजीत चव्हाण
बालाजी क्लिनिक,
विश्रांतवाडी, पुणे.

## बालाजी क्लिनीक

केस गळणे, टक्कल पडणे, कोंडा, चाई इ. विकारांवर
कॉम्प्युटराईज्ड हेअर व स्काल्प चेकअप -
हेअर हायड्रोथेरपी, लेझर व होमिओपॅथीक उपचार
त्वचेचे विकार - कॉम्प्युटराईज्ड स्किन चेकअप
लठ्ठपणा / वजन कमी करणे - बॉडी फॅट चेकअप
वरील सर्व व्याधींवर प्रभावी होमिओपॅथीक उपचार केले जातील.

डॉ. ज्योती चव्हाण 9890911417
डॉ. अभिजीत चव्हाण 9766357700

बालाजी क्लिनीक, संजना हाइट्स, टॅन्क रोड, शांती नगर रोड, विश्रांतवाडी, पुणे